# अभियांत्रिकी महाविद्यालय,

शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

☎ २५५०७०००/०९ फॅक्स : २५५०७२९९


जा. क्र. अमपु/आस्था-३/०९/3137 ३०.६.२००९

कार्यालयीन आदेश :

विषय : शासकीय सेवेतील महिला कर्मचा-यांच्या लैंगिक छळवणूकीसंबंधीच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

संदर्भ : या कार्या.आदेश जा.क्र.अमपु/आस्था-३/२००६/१३३ दि. ४/१२/०८

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार शासकीय व निमशासकीय कार्यालयातील महिला कर्मचा-यांकडून लैंगिक छळवणूकीसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यास सत्वर कार्यवाही करण्याचे आदेश शासनाने दिलेले असल्यामुळे उपरोक्त संदर्भिय आदेशाद्वारे जी समिती गठीत केली होती ती अधिक्रमित करून संस्थास्तरावर खालीलप्रमाणे नवीन समिती गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १. प्रा. श्रीमती एस. आर. पाठक प्राध्यापक, स्थापत्त्य | अध्यक्ष |
| २. प्रा. श्री. सी.वाय.पाटील, सहा.प्राध्यापक, उपकरणीकरण | सदस्य |
| ३. प्रा. श्रीमती व्ही.एस.राजगुरू, सहा. प्राध्या. विद्युत | सदस्य |
| ४. श्री. जी.बी.जोशी, प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ५. श्रीमती आर.एम.मिरगणे, प्रयोगशाळा सहायक | सदस्य |

सदर समितीकडे प्रस्तुत प्रकरणी जर काही तक्रार अर्ज प्राप्त झाले तर त्या तक्रार अर्जांची छाननी करून त्याचा अहवाल निम्नस्वाक्षरीकारांस १५ दिवसांच्या आत सादर करावा.

सदर समिती हा कार्यालयीन आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून पुढील कार्यालयीन आदेश निर्गमित होईपर्यंत कार्यान्वित राहिल.

संचालक,
अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.

प्रति

सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी. (विभाग प्रमुखांमार्फत).

प्रत : सर्व विभाग प्रमुख/अधिष्ठाता यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
विभाग प्रमुखांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या विभागातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना सदर समितीविषयी कळवावे व तसा अनुपालन अहवाल कार्यालयास सादर करावा.

Adeshenq09/25609